पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक:नस/५/कावि/२६९/२०१९
दिनांक- ८/११/२०१९

प्रति,

मा. ...................................
सदस्य,पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा.महापालिका सभा दिनांक २०/११/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत.

मा.महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **नोव्हेंबर-२०१९** ची मासिक मा.महापालिका सभा **बुधवार** दिनांक **२०/११/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.</u>

## सूचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे अनुसूची प्रकरण २ मधील
नियम क्रमांक १ (ए) (एच) (आय) अन्वये)

<u>**कार्यपत्रिका क्रमांक–३७**</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **नोव्हेंबर-२०१९** ची मासिक मा.महापालिका सभा **बुधवार** दिनांक **२०/११/२०१९** रोजी दुपारी **२.००** वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

-----

<u>**प्रश्नोत्तरे**</u>

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये )

------

<u>**मा.स्थायी समितीचे ठराव**</u>

**विषय क्रमांक १)** संदर्भ – १) मा.अति.आयुक्त(२) यांचे कडील पत्र
क्र.स्व.भा.अ.क/३/कावि/८५/१९ दि.०४/११/२०१९
२) मा.स्थायी समितीकडील ठराव क्र.५८२८ दि.६/११/२०१९

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक स्वमअ-२०१९/प्र.क्र.८२/नवि-३४ दिनांक २४ मे २०१९ नुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी कचरामुक्त शहरांना तारांकित मानांकन देण्याबाबत सुचना प्राप्त झालेल्या आहेत. त्याप्रमाणे शासन निर्णय नगर विकास विभागाकडील क्र. स्वअम २०१५/प्र.क्र.२३/नवि ३४ दिनांक १५ मे २०१५ नुसार कार्यवाही करावयाची आहे. या निर्णया अन्वये संपुर्ण राज्यामध्ये मिशन मोड पध्दतीने अभियान सुरु करण्यात आलेले आहे. या अभियानांतर्गत सर्व शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापनांतर्गत स्वच्छ करणे या दोन मुख्य बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे. स्वच्छ भारत अभियान कार्यक्रमा अंतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्वच्छ सर्वेक्षण २०२० ची अंमलबजावणी करीत आहे त्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड शहराची कचरामुक्त शहर स्टार रेटिंग जाहीर करणे आवश्यक आहे. स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० अंतर्गत पिंपरी चिंचवड शहरास पाच तारांकित नामांकन (5 स्टार रँकीग) कचरा मुक्त शहर (गारबेज

फ्री सिटी) करणे करीता केंद्र शासनाने तयार केलेल्या नियमावली, मार्गदर्शक सुचना व कार्यपध्दतीनुसार उपाययोजना करीत आहे. पिंपरी चिंचवड शहरातील घरोघरी कचरा संकलन करणे, घरोघरी कच-याचे वर्गीकरण करणे, कच-याची वाहतूक करणे व प्रकिया करणे करीता केलेली व्यवस्था, गटर, नाले व सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छता ऍपचा वापर, प्लास्टिक बंदी कार्यवाही तसेच ५०० टीपीडी चे मॅकेनिकल कंपोस्ट प्लॉन्ट, ३० टीपीडी वर्मी कंपोस्ट प्लॉन्ट, ५ टीपीडी प्लॅस्टीक टु फ्युअल ची व्यवस्था केलेली आहे. याबाबत जनतेकडून हरकती व सूचना १५ दिवसांच्या कालावधीत मागवुन घेऊन प्राप्त हरकती व सूचनांची पडताळणी करुन घेउन मानंकाबाबत समाधान असल्यान प्रस्ताव शासनास सादर करेल व ५ तारांकीत मानांकनासाठी शासनाने दिलेल्या स्वयंघोषणा करावयाची आहे. सबब, पिंपरी चिंचवड शहर पाच तारांकित नामांकन (5 स्टार रॅंकीग) साठी शासनाने नमुद केलेले सर्व नियम पुर्ण करीत आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड शहर स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० अंतर्गत पाच तारांकीत नामांकन (5 स्टार रॅंकीग) कचरा मुक्त शहर म्हणुन मान्यता देणेकामी मा.महापालिकासभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## <u>मा.आयुक्तां कडून आलेली पत्रे/काम</u>

**विषय क्रमांक २)** संदर्भ –१) मा.अतिरिक्त आयुक्त (२) यांचेकडील पत्र
क्र.स्वभाअक/३/कावि/२१०/२०१९ दिनांक ५/११/२०१९

केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान"च्या धर्तीवर राज्यामध्ये "स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)" राबविणेत येत आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वत:चे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागणदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण ११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून अनुक्रमे र.रु ४,९३,१४,९६१/- व ९,१०,५४,९७४/- असे एकुण र.रु. १४,०३,६९,९३५/- अनुदान प्राप्त झाले आहे.

प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/-, राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/- याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येत आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३१/१०/२०१९ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र“अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | १७४९० | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | १७४९० | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | १४८५४ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | एकुण बांधकाम पुर्ण-१४९१८ | मनपा मार्फत बांधकाम पुर्ण- १०२५१<br>सी.एस.आर(एनजीओ) मार्फत बांधकाम - ४६६७ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | ५८२ सीटस | महिला–२६२ सिटस कामकाज पूर्ण<br>पुरुष–३२० सिटस कामकाज पूर्ण |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | १०६९५ लाभार्थी | GOI+GOM=६४१.७० लाख | GOI = २०००/- व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB = २१३.९० लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८५५.६० लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १००४९ लाभार्थी | GOI+GOM=६०२.९४ लाख | GOI = २०००/- व GOM=४०००/- हिस्सा |
| | | ULB =२००.९८ लाख | ULB =२०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८०३.९२ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अमलबजावणीचा आढावा अवलोकन करणे.

-----

**समित्यांचे अहवाल**

**मा.शिक्षण समिती**

**विषय क्रमांक ३)** दिनांक १९/०९/२०१९ चा सभावृत्तांत कायम करणे.

----



(उल्हास बबनरावजगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/५/कावि/२६९/२०१९
दिनांक : ८/११/२०१९

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस् )
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.